तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram: Edutech, E-Mail : desk10@dte.org.in, Website: www.dte.org.in

क्रमांक : १०/पदविका/तंशिसं/२००९/३२६
दिनांक :- ७ ऑगस्ट AUG 2009

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती.

विषयः- सध्या कार्यरत असलेल्या तंत्रनिकेतनांमधून सेकंडशिफट चालविण्याबाबत.
संदर्भः- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मार्गदर्शक सूचना.

आपल्या विभागांतर्गत काही विना अनुदानित तंत्रनिकेतनांमधून सध्या सेकंडशिफट चालू आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने सेकंडशिफ्ट चालविण्यासाठी खालीलप्रमाणे मानके दिलेली आहेत. त्यानुसार संबंधित संस्थांना सेकंडशिफ्ट राबविण्यात यावी यासाठी आपल्या स्तरावरुन सर्व संस्थांना सूचना देण्यात याव्यात.

१. ज्या संस्था सेकंडशिफ्ट राबवितात अशा संस्थांनी पहिली शिफ्ट सकाळी ७.०० ते दुपारी १.३० या वेळेमध्ये राबवावी व दुसरी शिफ्ट दुपारी २.०० ते सायंकाळी ८.३० या वेळेत राबवावी.
२. संस्थेमध्ये २०टक्के पुस्तके व जर्नल जादा खरेदी करण्यात यावी तसेच कार्यालयाची वेळ रात्रौ ८.३० पर्यंत वाढविण्यात यावी.
३. एक विभागप्रमुख अथवा सिनिअर लेक्चरर ज्यांना कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव आहे अशा व्यक्तीची सेकंडशिफ्ट साठी उपप्राचार्य म्हणून नेमणुक करावी.
४. सेकंडशिफ्टसाठी ५० टक्के शिक्षक जादा नेमण्यात यावे. २५ टक्के शिक्षक अभ्यागत अधिव्याख्याता म्हणून नेमण्यात यावे व २५ टक्के सध्या कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना जादा कार्यभार म्हणून देण्यात यावा. जादा कार्यभार दिलेल्या शिक्षकांना ५० टक्के बेसिक पगार अधिक महागाई भत्ता इतके मानधन दुसऱ्या सत्राचे काम केल्याबद्दल देण्यात यावे.
५. कमीत कमी ५० टक्के शिक्षकेतर कर्मचारी सेकंडशिफ्ट साठी जादा नेमण्यात यावे. सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ५० टक्के स्टाफ दुसऱ्या शिफ्टसाठी वापरु शकतो. जादा कार्यभार दिलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ५०टक्के बेसिक पगार अधिक महागाई भत्ता इतके मानधन सेकंडशिफ्टच्या कामासाठी जादा देण्यात यावे. सेकंडशिफ्ट राबवित असताना विद्यार्थ्यांची किंवा पालकांची कोणतीही तक्रार येणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
24 AUG 2009
आबक क्र. L3YL

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

जा. क्र. तंशिविकापु/विवि/सेकंड शिफ्ट/L398

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दिनांक :- २७/०८/२००९.
27 AUG 2009

प्रत :- सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तंत्रनिकेतने संस्था, यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

(डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.